**शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकातील २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविणेबबत.**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः आरटीई-२०१६/प्र.क्र. ४१५/एस.डी-१

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १० जानेवारी, २०१७

<u>संदर्भ:-</u>

१) केंद्र शासनाची अधिसूचना दिनांक २७/८/२००९
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१०/प्र.क्र. २१२(बी)/पीई-१, दिनांक ११/१०/२०११
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१२/प्र.क्र. ११२/पीई-१, दिनांक १५/०३/२०१३
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१४/प्र.क्र.४५/पीई-१, दिनांक १५/०५/२०१४.

<u>प्रस्तावना:-</u>

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९ राज्यामध्ये दिनांक १ एप्रिल, २०१० पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमांतर्गत शासन अधिसूचना दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ अन्वये तयार केलेले नियम लागू करण्यात आलेले आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता वेळोवेळी शासन निर्णय व अधिसूचना निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**२.** या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०११ व दिनांक २५ एप्रिल, २०१६ अन्वये विद्या प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना घोषित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्य बाल हक्क आयोगाची शासन निर्णय दिनांक ०४ जुलै, २००७ रोजी स्थापना करण्यात आली आहे. तसेच, प्राथमिक शिक्षणाची व्याख्या व स्तर (१ ली ते ८ वी) Elementary Cycle मध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २४ मार्च, २०१५ व दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ अन्वये पारित करण्यात आला आहे.

**३.** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१)(सी) नुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांना विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळांमध्ये (non-minority schools- Unaided, Parmanent Unaided) किमान २५ टक्के प्रवेश ठेवण्याची तरतुद आहे.

तसेच अशा प्रवेशित बालकांचे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची तरतूद आहे. दिनांक १५ मार्च, २०१३ च्या शासन अधिसूचनेन्वये २५ टक्के प्रवेशाबद्दलचे नियम व याबाबतची कार्यपध्दती विहित केलेली आहे. तसेच दिनांक १५ मे, २०१४ च्या अधिसूचनेन्वये ऑनलाईन प्रवेश पध्दतीने करावयाची कार्यपध्दती विहित केलेली आहे. तथापि, २५ टक्के जागांवर प्रवेशासंदर्भातील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावी. तसेच, नागरिकांमध्ये या प्रक्रियेबाबत अधिक जागरुकता होण्यासाठी उपायोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

सन २०१६-१७ पासून २५ टक्के प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. सदर प्रवेश प्रक्रियेमधील येणाऱ्या अडचणी दूर करुन ती प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

### अ) प्रवेश प्रक्रिया प्रसिध्द करण्याबाबत -

१. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या २५ टक्के प्रवेशाकरिता पात्र असणाऱ्या शाळांची यादी प्रथमत: निश्चित करावी. तसेच या शाळांची यादी व संपूर्ण ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा कालावधीनिहाय तपशील स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमीद्वारे जाहिर करावा.

२. २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस पात्र असणाऱ्या सर्व शाळांनी या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणे अनिवार्य राहील.

३. २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस पात्र असणाऱ्या सर्व शाळांनी २५ टक्के प्रवेशाबाबतच्या माहितीचा फलक शाळेच्या दर्शनी भागात नागरिकांना सहज दिसेल अशा पध्दतीने लावावा.

४. या माहितीची फलकावर (२५% प्रवेशाकरीता असणारी वेबसाईट) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा कालावधी, प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक माहितीचा समावेश असावा.

५. त्याचप्रमाणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी या प्रवेश प्रक्रियेची अधिक माहिती नागरिकांना मिळण्यासाठी संबंधित नपा / मनपाग्रामपंचायत / पंचायत समिती यांना सूचना देऊन नपा / मनपाग्रामपंचायत / पंचायत समितीच्या फलकावर याबाबतची योग्य ती प्रसिध्दी करावी. तसेच महत्वाच्या ठिकाणी २५ टक्के प्रवेशाबाबतची माहिती देणारे भित्तीपत्रके / बॅनर लावण्यात यावेत. त्यामध्ये प्रवेशासाठी आवश्यक लागणारी कागदपत्रे, प्रवेशाचे वेळापत्रक, मदत केंद्रांची नावे तसेच शाळानिहाय इयत्ता १ ली किंवा पूर्व प्राथमिक वर्गातील प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के प्रवेशांतर्गत उपलब्ध होणाऱ्या जागासंदर्भात इ. सविस्तर माहिती असावी. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या पोर्टलवर माहिती अपलोड करावी. तसेच video clip तयार करुन पोर्टलवर/यु-टयुबवर टाकावी.

६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी या संदर्भात वेळोवेळी पत्रकार परिषदा घेवून आवश्यक माहिती सर्वांना द्यावी व याबद्दलची संबंधित घटकांमध्ये जागृती करावी.

## ब) प्रवेश प्रक्रियेकरिता नियोजित कालावधी-

१. सन २०१७-१८ पासून दरवर्षी प्रवेश प्रक्रिया ही जानेवारी पासून सुरु करुन एप्रिल अखेरपर्यंत पार पाडण्यात यावी. प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक **परिशिष्ट "अ"** प्रमाणे राहील. सदर वेळापत्रकामध्ये शिक्षण संचालक (प्राथ.) हे प्रवेश प्रक्रियेचा आढावा घेऊन आवश्यकते प्रमाणे बदल करु शकतील.

२. शाळा नोंदणी करण्यासाठी किमान १५ दिवसांचा कालावधी देण्यात यावा. २५ टक्के प्रवेश प्रक्रिया लागू असलेल्या सर्व पात्र शाळांनी याकरिता नोंदणी करणे बंधनकारक आहे. या शाळांनी अधिनियमातील १२(I)(c) नुसार तसेच दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित शाळेने २५ टक्के प्रवेशाकरिता प्रवेश स्तर (Entry Level) नोंदवावेत. प्रवेशस्तर (Entry Level) शाळेने ठरवावा.

३. शाळा नोंदणीबाबत शाळा प्रमुख, अधिकारी यांचे प्रशिक्षण, मदत केंद्रांमार्फत घेण्यात यावे. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी राज्यातील जिल्हानिहाय मदत केंद्रांची यादी जाहीर करावी.

४. प्रवेश प्रक्रियेदरम्यान शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अधिनस्त क्षेत्रात पुरेशा मदत/सहाय्य केंद्रांची स्थापना करावी.

५. पालकांना ऑनलाईन अर्ज करताना येणाऱ्या समस्या तसेच शाळांना ऑनलाईन नोंदणी करताना येणाऱ्या समस्या विचारात घेवून त्यावर आधारित प्रशिक्षणाचे नियोजन करावे. या करिता छोटे व्हीडिओज किंवा पोर्टलवर मराठीमध्ये सूचना उपलब्ध करुन द्याव्यात.

६. ऑनलाईन प्रक्रियेत शाळेने केलेल्या नोंदणीची पडताळणी संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करावी. ज्या शाळा २५ टक्के प्रवेशाकरिता पात्र आहेत परंतु नोंदणी करत नाहीत किंवा Entry Level स्तरावरील एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागा उपलब्ध करुन देणार नाहीत अशा शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी तात्काळ मान्यता काढण्याबाबत तसेच नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याबाबत नोटीसा दयाव्यात.

७. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया प्रतिवर्षी जानेवारीमध्ये सुरु करुन सर्व फेऱ्या एप्रिल अखेर पूर्ण कराव्यात. मुलांच्या ऑनलाईन प्रवेशाबाबतचे संदेश (निवड झालेल्या/निवड न झालेल्या मुलांबाबत) विहित वेळेत पालकांना दिले जातील याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

८. दिनांक १५ मार्च २०१३ च्या अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे प्रवेशासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

i) जन्माचे प्रमाणपत्र व वास्तव्याचा पुरावा (अनिवार्य). (भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत आवश्यक)

ii) सामाजिक वंचित घटक (पालकांचा जातीचा दाखला अनिवार्य) (परराज्यातील जातीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाहीत.)

iii) आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्पन्नाचा दाखला

(उत्पन्नाचा दाखला रु. १ लाखापेक्षा कमी उत्पन्न)

iv) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ४० टक्के पेक्षा जास्त अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

९. पालकांनी संगणकीय ऑनलाईन माहिती भरताना बालकाचे नावातील/ आडनावातील किरकोळ चुका गृहित धरुन शाळांना प्रवेश नाकारता येणार नाही. पालकांनी कोणतेही कागदपत्र अपलोड करु नये. शाळांनी मुलांनी सादर केलेले कागदपत्र व जन्मप्रमाणपत्र पाहून त्यानुसार शाळेच्या दस्ताऐवजावर / रजिस्टरमध्ये (दाखल्यावर) आवश्यकत्या नोंदी कराव्यात व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सूचित करावे.

१०. उत्पन्नाचा दाखला प्रवेश प्रक्रिया सुरु होणाऱ्या एक वर्षापूर्वीच्या आर्थिक वर्षातील असावा, उदा. सन २०१७-१८ मध्ये प्रवेश घेताना पालकांचे सन २०१५-१६ या वर्षातील उत्पन्नाचा दाखला प्रवेशाकरिता ग्राहय समजण्यात यावा. उत्पन्नाचे दाखले हे संबंधित प्राधिकरण (तहसिलदार कार्यालय) यांनी प्रमाणित केलेले असावेत. हे दाखले पुन्हा तपासण्याचे अधिकार शाळांना असणार नाहीत. आर्थिक दुर्बल घटकातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या उत्पन्नाच्या दाखल्याची पडताळणी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने संबंधित तहसील कार्यालयाशी करावी. ज्या पालकांचे उत्पन्नाचे दाखले बनावट निघतील अशा पालकांच्या पाल्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील व त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

११. प्रवेश दिलेल्या मुलांचे शाळेपासून ते घरापर्यन्तचे हवाई अंतर हे गुगल मॅपने निश्चित केलेले असल्याने प्रत्यक्षात त्यामध्ये काही ठिकाणी भौगोलिक परिस्थितीनुसार तफावत येण्याची शक्यता आहे. सबब शाळा निवडताना अंतराची बाब लक्षात घेऊन शाळेची निवड पालकांनी काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे.

१२. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना घराचा अचूक पत्ता तसेच खात्रीशीर कागदपत्रे जोडून फॉर्म भरण्याची संपूर्ण जबाबदारी पालकांवर राहील. जर विद्यार्थ्यांची निवड एकापेक्षा अधिकच्या शाळांमध्ये झाली असेल तर प्रवेश मिळालेल्या शाळांपैकी कोणत्याही एका शाळेत वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे

विहित मुदतीत प्रवेश घेणे आवश्यक आहे. शाळेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर सदरचा प्रवेश अन्य कुठल्याही २५ टक्के प्रवेशपात्र शाळेत बदलून दिला जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेअंतर्गत एखाद्या शाळेत प्रवेश निश्चित झालेल्या बालकाने त्या शाळेत प्रवेश न घेतल्यास त्या बालकास त्या वर्षातील पुढील प्रवेश फेऱ्यांच्या लॉटरीमध्ये सहभागी केले जाणार नाही.

**१३.** २५ टक्के ऑनलाईन प्रवेशाअंतर्गत प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांची संपूर्ण तपासणी करुनच शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी शाळेला यादी पाठवावी. सदर शाळांनी पाठविलेल्या यादीमधील मुलांना विहित मुदतीत प्रवेश देणे बंधनकारक आहे. विहित मुदतीनंतर शाळेच्या अथवा पालकांच्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

**१४.** सदर प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करण्यात यावी, जेणेकरुन अद्यावत माहिती प्रशासनाकडे नेहमीच उपलब्ध राहील. प्रवेशाकरिता दिलेल्या यादीतील मुलांचे प्रवेश वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत न झाल्यास संबंधित शाळांवर मान्यता काढून घेण्याची नोटीस बजावण्यात यावी.

**१५.** संगणक प्रणालीमधून प्रवेश पात्र मुलांची यादी पाठवितांना खालील बाबी लक्षात घेण्यात याव्यात.

**१५.१)** शाळेची २५ टक्के मधील प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक १ किमी आतील विद्यार्थ्याचे अर्ज आल्यास त्या अर्जांमधून प्रवेश क्षमता एवढ्या विद्यार्थ्यांची निवड लॉटरी पध्दतीने करण्यात यावी. तथापि १ किमी च्या आतील विद्यार्थ्यांचे अर्ज प्रवेश क्षमतेपेक्षा कमी आले असल्यास त्या सर्व विद्यार्थ्यांची नावे प्रवेश यादीत घेण्यात यावीत.

**१५.२)** १५.१ च्या पातळीवर प्रवेश क्षमतेतील काही जागा उरल्यास १ ते ३ किमी मधील विद्यार्थ्यांचे अर्ज लॉटरीसाठी विचारात घेण्यात यावे. तथापि, बिंदू १५.१ धरून या पातळीवर सुध्दा प्रवेश क्षमता पूर्ण होत नाही एवढे कमी अर्ज आल्यास या पातळीवरील सर्व विद्यार्थ्यांची नावे प्रवेश यादीत घेण्यात यावीत.

**१५.३)** १५.१ व १५.२ नंतर उरलेल्या जागेसाठी ३ किमी पेक्षा अधिक अंतरातील अर्जांचा विचार करण्यात यावा. तथापि विद्यार्थ्यांच्या वाहतुकीचा खर्च संबंधित पालकांना करावा लागेल.

**१६.** एखाद्या शिक्षण संस्थेच्या एकाच आवारात इ. १ ली ते ४ थी पर्यन्त मान्यता असलेली एक शाळा असेल व तेथेच इ. ५ वी ते १० वीपर्यन्त मान्यता असलेली दुसरी शाळा असल्यास Elementary Cycle नुसार इ. १ लीला २५ टक्के प्रवेश प्रक्रिये अंतर्गत दिलेले प्रवेश पुढे त्याच संस्थेच्या त्याच परिसरातील (एकाच आवारातील) इ. ५ ते १० वी पर्यन्त असलेल्या शाळेत इ. ५ वी ते ८ वी करिता नियमित राहतील. त्याकरिता या शाळेत इ. ५ वी करिता वेगळयाने प्रवेश प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता नाही.

मात्र इ. ५ वीतील उर्वरित सर्वसाधारण प्रवेश प्रक्रिया करताना २५ टक्केच्या प्रमाणात जागा रिक्त ठेवणे शाळेस बंधनकारक राहील.

**१७.** २५ टक्के प्रवेश प्रक्रियेची यशस्वी अंमलबजावणी होण्याकरिता प्रवेश स्तर (Elementary Cycle) ते इयत्ता ८ वी पर्यन्त याकरिता पात्र असलेल्या शाळांनी प्रत्येक वर्गामध्ये २५ टक्के प्रवेश हे या प्रक्रियेतील लाभार्थी विद्यार्थ्यांसाठीच राहतील याची दक्षता शाळा प्रशासनाने घेणे आवश्यक राहील. या प्रवेश प्रक्रियेतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची गळती होणार नाही तसेच ही मुले शिक्षणापासून वंचित होणार नाहीत याचे सामाजिक दायित्व शाळा प्रशासनाचे राहील. २५ टक्के प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारे वेगळी/सापत्न वागणूक अथवा भेदभाव केला जाणार नाही याची दक्षता शाळा प्रशासनाने घेणे अनिवार्य राहील.

**१८.** २५ टक्के प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती शासनातर्फे प्रतिवर्षी निश्चित केलेल्या दरानुसार शाळांना करण्यात येईल.

**१९.** ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत प्रवेशित विद्यार्थी संख्या विचारात घेवून त्या शाळेस शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार करावयाच्या रक्कमेच्या प्रतिपूर्तीची गणनादेखील सिस्टिम मध्ये करण्यात यावे. जेणे करुन शाळांना प्रतिपूर्तीसाठी पुन्हा वेगळयाने तपशीलवार प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर करण्याची आवश्यकता असू नये. शासनाने शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या दरानुसार अथवा शाळेने निश्चित केलेले दर यापैकी जे कमी असेल त्या दराने अनुज्ञेय राहील. फीची प्रतिपूर्ती शाळांना केल्यानंतर पालकांना SMS द्वारे कळविण्यात यावे.

**२०.** शिक्षण हक्क कायदयानुसार २५% प्रवेशातंर्गत पटसंख्येनुसार प्रत्येक वर्गात उपलब्ध असणाऱ्या जागा व भरलेल्या जागा याची माहिती शाळांनी भरावी. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इ.१ली ते इ. ५ वी पर्यंत २५% प्रवेशातंर्गत भरलेल्या व निश्चित उपलब्ध जागांची माहिती भरावी. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार २५% इतक्या जागा रिकाम्या ठेवणे अनिवार्य राहील. तसेच, या जागा सर्वसाधारण गटातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्यावर्तीत / वर्ग करता येणार नाहीत. जागा रिकाम्या राहिल्यास शासन त्याची प्रतिपूर्ती करणार नाही त्यामुळे संबंधित शाळेचे नुकसानच होईल.

**२१. ऑनलाईन २५ टक्के प्रवेशप्रक्रिया राबविताना NIC तर्फे तयार करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात याव्यात.**

**अ)** २५ टक्के प्रवेशाकरिता नोंदणी करताना शाळांनी आकारत असलेल्या शुल्काबद्दलची माहिती दर्शविण्यात यावी.

**ब)** शाळांनी प्रवेश स्तराचा वयोगट २३ जानेवारी २०१५ च्या शासन निर्णयानुसार भरावा. सन २०१७-१८ या वर्षी इ. १ लीमध्ये प्रवेश घेणाऱ्या बालकाचे दिनांक ३० सप्टेंबर २०१६ रोजी किमान वय ५.४

इतके असेल. त्यामुळे सॉफ्टवेअरमध्ये ५.४ वर्षे वयाच्या आधीची बालके इ. १ लीमध्ये नोंदविली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**क)** शाळेने प्रवेशाची ऑनलाईन नोंद केल्यानंतर पालकांना प्रवेश निश्चित झाल्याची पावती देण्यासाठी सुविधा उपलब्ध करावी.

**ड)** प्रवेश अर्ज कमीतकमी माहिती असलेला सुटसुटीत करण्यात यावा. त्यामध्ये विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व वडिलांचे संपूर्ण नाव व आईच्या नावाचा तसेच प्रवेश ज्या वर्गात घेणार आहे त्या वर्गाचा व केवळ आवश्यक बाबींचाच समावेश असावा.

**इ)** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार २५% प्रवेशातंर्गत शाळांमध्ये इ. १ ली ते ५ वी पर्यंत दिलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांची अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिक दृष्टया मागास व दिव्यांग या वर्गवारीनिहाय माहिती ऑनलाईन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०११०१६२४२५८५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(डॉ. सुवर्णा खरात)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

२) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

३) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

४) मा. मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी

५) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १.

६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १.

७) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

८) संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

९) संचालक, बालभारती, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

११) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

१२) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ सर्व

१३) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व

१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, सर्व

१५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर शिक्षण)/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका/कटक मंडळे सर्व

१६) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व

१७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने)

# परिशिष्ट – अ

## RTE २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८

| वेळापत्रक | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **बाब** | **कालावधी** | **दिवस** |
| १ | शाळा नोंदणी | १६/०१/२०१७ ते ०३/०२/२०१७ | १९ |
| २ | पालकांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे | ०५/०२/२०१७ ते २१/०२/२०१७ | १७ |
| ३ | पहिली लॉटरी काढणे | २७/०२/२०१७ आणि २८/०२/२०१७ | १ |
| ४ | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे | ०१/०३/२०१७ ते ०९/०३/२०१७ | ९ |
| ५ | प्रवेश घेण्याच्या विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | १०/०३/२०१७ ते ११/०३/२०१७ | २ |
| ६ | दुसरी लॉटरी | १४/०३/२०१७ आणि १५/०३/२०१७ | १ |
| ७ | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे | १६/०३/२०१७ ते २१/०३/२०१७ | ६ |
| ८ | विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | २२/०३/२०१७ आणि २३/०३/२०१७ | २ |
| ९ | तिसरी लॉटरी | २४/०३/२०१७ आणि २५/०३/२०१७ | १ |
| १० | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे | २७/०३/२०१७ ते ०१/०४/२०१७ | ६ |
| ११ | विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | ०३/०४/२०१७ ते ०६/०४/२०१७ | ४ |
| १२ | चौथी लॉटरी | ०७/०४/२०१७ ते ०८/०४/२०१७ | १ |
| १३ | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे | १०/०४/२०१७ ते १५/०४/२०१७ | ६ |
| १४ | विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | १७/०४/२०१७ ते १८/०४/२०१७ | २ |
| १५ | पाचवी लॉटरी | १८/०४/२०१७ आणि २०/०४/२०१७ | १ |
| १६ | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे | २१/०४/२०१७ ते २७/०४/२०१७ | ७ |
| १७ | विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | २८/०४/२०१७ ते २९/०४/२०१७ | २ |